## ४. विद्यापीठ : नव्या दिशा आणि धोरणे

अकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत उच्च शिक्षणाचा विस्तार करण्यात आला. सर्व जगातच शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने शैक्षणिक सस्थांची वाढ होत आहे. उच्च शिक्षणातील समस्यांवर तोडगा काढणे आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि संशोधनाची आवश्यकता यांवर भर देण्यात आला आहे. पुणे विद्यापीठाने देशाच्या संदर्भात व्यावसायिक कौशल्य विकसनाकरिता पूर्ण विचार करून योजनाबद्ध कार्यक्रम तयार केलेला आहे. जागतिकीकरण केंद्रबिदू मानून उच्च शिक्षणामध्ये प्रामुख्याने सुधारणा व नवीन उपक्रम राबविण्यात येत आहेत. या संदर्भात पुणे विद्यापीठ अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

स्थापनेपासून (१९४९) पुणे विद्यापीठ हे अध्यापन आणि संशोधनामध्ये अग्रेसर आहे. शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधांची उपलब्धता आणि पूरक वातावरण यांमुळे हे विद्यापीठ अभ्यासक आणि संशोधकांचे आकर्षक केंद्र बनले आहे. कला, शास्त्र, वाणिज्य, भाषा, अभियांत्रिकी, विधी, माहिती व तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये अध्ययन व संशोधनाचा उत्तम दर्जा असल्यामुळे, जास्तीतजास्त विद्यार्थी पुणे विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. आजमितीला सुमारे साडेसहा लाख विद्यार्थी एकूण ६१३ संलग्नित महाविद्यालयांमधून आणि ४२६ मान्यताप्राप्त संस्थांमधून, पुणे, नाशिक आणि अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाचा विकास आणि संशोधनाचा दर्जा यांमध्ये उत्तरोत्तर प्रगतीसाठी विद्यापीठाने काही योजना आखलेल्या आहेत.

**१) अभ्यासक्रमांचे स्वरूप :**

* जून २००८पासून संपूर्ण अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली. आजतागायत सुमारे ६४० अभ्यासक्रम बदलण्यात आले. हे सर्व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.
* अनेक नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. उदा. यंत्रविषयक, स्वयंचलित अभ्यासक्रम, इत्यादी.
* आपत्ती व्यवस्थापन हासुद्धा अत्यावश्यक विषय म्हणून पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येईल.

**२) संशोधन विकसन :**

* पुणे हे भारतातील असे एकमेव विद्यापीठ आहे की जे वेगवेगळ्या संशोधन प्रकल्पांसाठी विद्यापीठ विभागांतील शिक्षकांना तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांना आर्थिक सहकार्य देते. २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात सुमारे ११४० संशोधन प्रकल्प अनुदानासाठी विद्यापीठाकडे आलेत त्यांपैकी ६४० संशोधन प्रकल्पांना विद्यापीठाने मान्यता दिली.
* विद्यापीठातील पदव्युत्तर विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयांनी एकूण २३ आंतरराष्ट्रीय, १३६ राष्ट्रीय, १८१ राज्यस्तरीय आणि २९६ जिल्हास्तरीय चर्चासत्रे/कार्यशाळांचे आयोजन केले.

* विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुणे विद्यापीठाने फेब्रुवारी २०१० मध्ये पीएच.डी. प्रवेशपरीक्षा आयोजित केली. त्यामध्ये ६४६१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेला प्रतिसाद दिला.
* ज्यांच्या संशोधन प्रकल्पांना अनुदान मिळाले अशा ५९२ शिक्षकांसाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने त्यांच्या संशोधन प्रकल्पांवर आधारित एका नावीन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यात शोधनिबंध सादर करण्यात आले.
* विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांवरील राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात पुणे विद्यापीठाच्या ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. १९ विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. (त्यांत प्रथम क्रमांकाची ११ व द्वितीय क्रमांकाची ८ बक्षिसे आहेत.)
* विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांसाठी अन्वेषण या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये तीन विद्यार्थ्यांनी भाग घेतला, त्यांतील दोन विद्यार्थ्यांना प्रथम आणि द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

**३) गुणवत्ता सुधार कार्यक्रम :**

संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी म्हणून विद्यापीठाने गुणवत्ता सुधार कार्यक्रमाची योजना राबविली. त्यामध्ये विविध विषयांवरील व्याख्याने, चर्चासत्रे आणि शैक्षणिक साधनांच्या खरेदीसाठी विद्यापीठाने सहकार्य केले. तसेच प्रसाधने, मुलींसाठी स्वतंत्र खोली, महिला शिक्षकांसाठी खोली, सायकल स्टँड, अतिथिगृह, इत्यादींसाठीही विद्यापीठाने महाविद्यालयांना अर्थसाह्य केले. त्यासाठी रु.दोन कोटींची तरतूद करण्यात आली.

विद्यापीठाने विद्यापीठातील परिसर, संलग्नित महाविद्यालये आणि संस्था यांना जोडणारी दृक-श्राव्य व संगणकीय यंत्रणा (audio, visual and data) विद्यापीठ स्थापित करीत आहे. या योजनेद्वारे त्या त्या विषयाचे तज्ज्ञ सर्व शिक्षकांशी संवाद साधू शकतील, आणि त्यांच्या ज्ञानाचा सर्व शिक्षकांना लाभ मिळेल.

**४) विद्यार्थी आधार योजना**

**अ) कमवा आणि शिका योजना :**

विद्यापीठ प्रतिवर्षी पाच कोटी रुपयांची तरतूद करून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा आणि शिका अशी उल्लेखनीय योजना राबवीत आहे. या योजनेअंतर्गत विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील आर्थिक गरजू विद्यार्थ्यांना प्रतितास रु.२० या प्रमाणे त्यांच्या मागणीनुसार काम दिले जाते. यांमधून विद्यार्थ्यांना स्वाभिमान आणि श्रमाचे महत्त्व कळते.

**ब) सॉफ्ट स्किल योजना :**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यापीठाने नावीन्यपूर्ण कार्यक्रम आखला आहे. या अंतर्गत आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या तसेच विकासापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी १५ दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये इंग्रजी संभाषणकौशल्य, मुलाखततंत्र, समूहचर्चा आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, इत्यादी विषयांची महिती दिली जाते. ५० टक्के प्रवेश फक्त मुलींसाठीच राखीव ठेवण्यात येतो. ही योजना १९० महाविद्यालयांमध्ये यशस्वीपणे राबविली जाते. यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालयाला प्रत्येक गटाच्या खर्चासाठी रु.५०००/- देण्यात येतात. विद्यापीठाने अनेक महाविद्यालयांना भाषाप्रयोगशाळेसाठी

ऑडिओ संच दिलेले आहेत. ही सर्व केंद्रे व्यक्तिमत्त्व विकासासाठी कार्यरत आहेत. यांतून विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळण्याची अपेक्षा आहे.

**क) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती :**

पदवी आणि पदव्युत्तर वर्गात शिकणाऱ्या गरजू मुलींना रु.५०००/- प्रतिवर्षी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. विशेषत: देवदासी, विधवा, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलींना ही शिष्यवृत्ती प्राधान्याने दिली जाते. यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**ड) ऑनलाईन सुविधा :**

पुणे विद्यापीठाने विद्यार्थी आधार केंद्र निर्माण केले आहे. यामध्ये संलग्निकीकरण, प्रवेशप्रक्रिया, शिक्षकांसंबंधी माहिती, स्थलांतरप्रक्रिया, शोधप्रकल्प अहवाल, आविष्कार, इत्यादींची माहिती ऑनलाईन दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, कष्ट आणि पैसा वाचतो.

**ई) खेळांसाठी शिष्यवृत्ती :**

जे विद्यार्थी सांघिक व व्यक्तिगत बक्षिसे मिळवितात त्यांच्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते. पुणे विद्यापीठ हे भारतातील एकमेव विद्यापीठ आहे की जे विद्यार्थ्यांना खेळांसाठी शिष्यवृत्ती देते. यामुळे विद्यार्थ्यांचा खेळामधील सहभाग वाढतो.

**फ) एम.फिल. आणि पीएच.डी.साठी स्टायपेंड**

एम.फिल. आणि पीएच.डी.च्या निवडक विद्यार्थ्यांसाठी ही व्यवस्था आहे. विद्यापीठातील विभाग आणि संलग्नित महाविद्यालयांना संशोधन केंद्रे यांच्यासाठी ही योजना आहे. एम.फिल. करणाऱ्या विद्यार्थ्याला रु. ३००० / आणि पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्याला रु. ६००० / प्रत्येक महिन्याला देण्यात येतात. ही सुविधा फक्त एक वर्षासाठीच आहे.

❑❑